बुधवार, दि ४ जून २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ३७ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना ५३ टक्के महागाई भत्ता

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा; सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास पास आता वर्षभरासाठी

**मुंबई** - राज्यातील राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावर जून २०२५ पासून ४६ टक्के ऐवजी ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. महामंडळातील कर्मचाऱ्यांना महात्मा फुले जनआरोग्य योजना किंवा धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना यापैकी एक निवडण्याचा पर्याय, एक कोटी रुपयांचे अपघाती विमा कवच लागू करण्याचा तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास पास नऊ ऐवजी १२ महिन्यासाठी देण्याचा निर्णयही उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केला.

सह्याद्री अतिथीगृह येथे एसटी महामंडळाच्या विविध संघटनांच्या प्रतिनीधींची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सदाभाऊ खोत, माजी खासदार आनंदराव अडसुळ, कॅप्टन अभिजीत अडसूळ, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महामंडळाचे उपाध्यक्ष माधव कुसेकर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, सामान्यांसाठी जीवनवाहिनी असलेल्या एसटीच्या बससेवेच्या माध्यमातून लोकांना अपेक्षित अशी चांगली सेवा मिळाली पाहिजे. बसगाड्या सोबतच बसस्थानके देखील स्वच्छ असली पाहिजे. स्वच्छतागृह, विश्राम कक्ष यांच्या स्वच्छतेसाठी प्राधान्य दिले पाहिजे. एसटीच्या माध्यमातून कार्गो सेवा सुरू करण्यावर भर देण्याचे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. बसस्थानके हे बस पोर्ट झाली पाहिजेत असे सांगत एसटी अधिक फायद्यात राहण्यासंदर्भात अभ्यास करा. एसटीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे यासाठी प्रयत्न करण्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले.

यावेळी संघटनांच्या प्रतिनीधींनी विविध मागण्या केल्या. एसटीची उत्पन्न वाढ, इंधन बचत, यावरही चर्चा झाली. महामंडळातील कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावर ४६ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात



येत आहे. जून २०२५ च्या वेतनापासून मूळ वेतनावर ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येणार आहे. महागाई भत्त्याच्या थकबाकीबाबत पान ३ वर

### युवा आदर्श
### चरित्र ...

प्रकाशन करे कुणी
आपले आत्म चरित्र
चारित्र्यहीन नेतेपण
रेखाटे आपले चित्र
माहिती असते सर्वां
वाचत नाही ते कुत्रं
जाणून असती सारे
कसे आहे मेषपात्र
खरे खोटे अनुभव ते
सगळे करावे एकत्र
प्रस्तावना लिहायला
शोधा छान कृपाछत्र
लेखक बरा शोधावा
आपले नाही हे क्षेत्र
स्तुतीपाठ करायला
जमवा थोडेसे मित्र
घोड्या बसवा नवरा
एखादा दत्तक पुत्र
बांधून घेणारं कोण
गळ्यामधे मंगळसूत्र
कमी किमतीत ठेवा
पुस्तक विक्री सर्वत्र
रद्दीत तोलले जाईलं
गाथा आपली पवित्र

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# मोफत कॅन्सर व सर्वरोग निदान शिबिरात १७५ जणांची तपासणी

## जैन संघटना, लायन्स क्लब, वीरा मेडीसिटी हॉस्पिटलचा संयुक्त उपक्रम

**जालना । प्रतिनिधी** - भारतीय जैन संघटनेची जालना शहर शाखा, लायन्स क्लब ऑफ जालना, वीरा मेडीसिटी हॉस्पिटल आणि वीरा कार्किनोस कॅन्सर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. ३ जून रोजी आयोजित मोफत कॅन्सर तपासणी व सर्वरोग निदान शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, १७५ जणांची तपासणी करण्यात आली. काही दोष आणि लक्षणे आढळून आलेल्या रुग्णांना मार्गदर्शन करण्यात आले. .

वीरा मेडीसिटी हॉस्पिटलमध्ये आयोजित या शिबिराचे उद्घाटन भारतीय जैन संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष विनयकुमार कोठारी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी वीरा मेडीसिटी हॉस्पिटलचे संचालक किसनराव विघ्ने यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर डॉ. सुहास किसनराव विघ्ने, जैन संघटनेचे विभागीय उपाध्यक्ष विजय सुराणा, जालना जिल्हाध्यक्ष विजय जैन, शहराध्यक्ष राजेश लुनिया, संजय लव्हाडे, लॉयन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्डा, सचिव मंजू श्रीमाली, अतुल लढ्ढा, जयप्रकाश श्रीमाली, पांडुरंग सांगळे, प्रकाश कुंडलकर, अरुण मित्तल, पवन देशमुख, पवन सेठीया, सुभाष विनायक्या आदींची उपस्थिती होती.

३ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात कॅन्सर तज्ञ डॉ. संकुत कोठारी आणि डॉ. प्रणोती हिरळकर, सांधेवातज्ञ डॉ. सुहास किसनराव विघ्ने, नेत्ररोग तज्ञ डॉ. नीता सुहास विघ्ने, रेडिओलॉजिस्ट डॉ. राजेंद्र राख, दंत रोग तज्ञ डॉ. सुषमा राजेंद्र राख, अस्थिरोग तज्ञ डॉ. तेजस ताठे, डॉ. प्रवीण सोनूने, स्त्री रोग तज्ञ डॉ. प्रवीण ससाने, बालरोग तज्ञ डॉ. नितेश भोजने, सर्जन डॉ. अविनाश सुराशे, कान, नाक व घसा तज्ञ डॉ. सागर गंगवाल, पॅथॉलॉजी तज्ञ डॉ. मिलिंद काठोळे यांनी १७५ जणांची मोफत तपासणी करून पान ३ वर



# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा ७७ वा वर्धापन साजरा



**परतूर । प्रतिनिधी** - परतूर येथील आगारात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा ७७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.आगारात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रशस्तिपत्रक देउन विभागीय भांडार अधिकारी लाड आणि आगार प्रमुख माधुरी देशमुख यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.यावेळी वाहतूक निरीक्षक, श्रीमती साळवे. सहाय्यक वाहतूक निरीक्षक, कचार,बरसाले, पाळी प्रमुख अरुण तरासे,वाहक तरासे चालक सानप, मच्छींदर काळे, लेखापाल कुळकर्णी, सर्व यांत्रिक कर्मचारी आणि चालक, वाहक तसेच प्रवासी उपस्थित होते.



# संपादकीय

## विनोद सम्राट

मराठी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ विनोदी अभिनेते, विनोद सम्राट, चित्रपट सृष्टीचे मामा, पद्मश्री अशोक सराफ यांचा आज ७८ वा वाढदिवस. विनोदाचा हा सम्राट बघता बघता ७८ वर्षाचा झाला यावर रसिकांचा विश्वास बसणे कठीण असले तरी ते सत्य आहे. अशोक सराफ यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी म ुंबईत झाला. मूळचे बेळगावचे असणारे अशोक सराफ यांचे बालपण मुंबईतील चिखलवाडी भागात गेले. त्यांचे शिक्षण मुंबईतील डि. जि. टी विद्यालयात झाले. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी ययाती आणि देवयानी या नाटकात विदुषकाची भूमिका साकारली होती. दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. या चित्रपटातील त्यांनी साकारलेली इरसाल हवालदाराची भूमिका खूप गाजली. दादा कोंडके यांच्याच राम राम गंगाराम या चित्रपटात त्यांनी म्हमद्या खाटीक ही भूमिका साकारली. कारकिर्दीच्या सुरवातीलाच केलेल्या विनोदी भूमिका लोकप्रिय ठरल्याने त्यांना विनोदी भूमिकाच मिळत गेल्या आणि त्यांनीही त्या भूमिकांना न्याय देऊन प्रेक्षकांना खळखळून हसवले. ८० च्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या समवेत त्यांची जोडी जमली. पडद्यावरील अशोक सराफ आणि लक्षा या जोडीने मराठी चित्रपटसृष्टित अक्षरशः धुमाकूळ घातला. या दोघांनी एकत्र अभिनय केलेल्या अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, दे दणादण यासारख्या चित्रपटांनी धमाल उडवून दिली. सचिन आणि महेश कोठारे या दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले व अशोक सराफ यांनी अभिनय केलेले नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा शुभ मंगल सावधान, आई नंबर वन, एक शेर दुसरी सव्वाशेर , नवरा पावशेर, नवसाचा नवरा, आयडीयाची कल्पना हे चित्रपट देखील लोकप्रिय झाले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदी भूमिकाच केल्या असे नाही तर काही गंभीर भूमिका देखील केल्या. वजीर चित्रपटात त्यांनी साकारलेला गंभीर राजकारणी भाव खाऊन गेला तर चौकट राजा चित्रपटातील त्यांनी साकारलेली सहृदय व्यक्तीची भूमिका लोकांच्या मनात घर करून गेली. अशोक सराफ यांनी अभिनय केलेले आई नंबर वन, आत्मविश्वास, नवरी मिळे नवऱ्याला, धुमधडाका, गंमत जंमत, माझा पती करोडपती, दे दणादण, एक डाव भुताचा, भुताचा भाऊ, शेजारी शेजारी, एक उनाड दिवस, अफलातून, गोंधळात गोंधळ, अशी ही बनवाबनवी, सगळीकडे बोंबाबोंब, आयत्या घरात घरोबा, कुंकू, घनचक्कर, वजीर, एकापेक्षा एक, अनपेक्षित, चंगू मंगू , शुभमंगल सावधान, आमच्या सारखे आम्हीच, बाळाचे बाप ब्रह्मचारी, प्रेम करूया खुल्लम खुल्ला, गोष्ट धमाल नाम्याची, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, कळत नकळत, अरे संसार संसार, आपली माणसं, एक डाव धोबीपछाड, आयडीयाची कल्पना, साडे माडे तीन हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट विशेष गाजले. त्यांनी केवळ मराठीच नाही तर हिंदी चित्रपटातही काम केले. करण अर्जुन, कुछ तुम कहो कुछ हम कहे, बडे घर की बेटी, बेटी नंबर वन, कोयला, गुप्त , संगदिल सनम, प्यार किया तो डरणा क्या?, जोरू का गुलाम, खूबसुरत, यस बॉस, सिंघम या हिंदी चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका विशेष लक्षात राहण्यासारख्या आहेत. हम पांच, टना टन टन, डोन्ट वरी, हो जायेगा, छोटी बडी बाते यासारख्या काही टीव्ही मालिका देखील त्यांनी केल्या. त्यांनी भूमिका केलेले हमीदा बाईची कोठी, अनधिकृत मनोमिलन, हे राम, कार्डिओग्राम, सारखं छातीत दुखतंय ही नाटकेही खूप गाजली. चित्रपट, टीव्ही, रंगमंच अशा तिन्हीं माध्यम ातून त्यांनी आपल्या अभिनयाची मुशाफिरी केली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी २०० हुन अधिक चित्रपटात भूमीका केल्या. रंजना, उमा भेंडे, प्रेमा किरण, निवेदिता जोशी, वर्षा उसगावकर, अश्विनी भावे, अलका कुबल, प्रिया बेर्डे, किशोरी शहाणे या आणि अशा अनेक अभिनेत्रींसोबत त्यांनी भूमिका केल्या. विशेष म्हणजे या सर्व अभिनेत्री त्यांना सेटवर मामा म्हणत. आज तर ते संपूर्ण चित्रपट सृष्टीचे मामा झाले आहेत. आज त्यांना अशोक मामा याच नावानेच ओळखले जाते. अशोक सराफ यांना अशोक मामा हे नाव कसे पडले हे पाहणे देखील रंजक आहे. एका चित्रपटाच्या सेटवर प्रकाश शिंदे नावाच्या कॅमेरामन सोबत त्यांची मुलगी येत असत. सेटवर आली की ती विचारत असे, हे कोण ? त्या कॅमेरामनने सांगितले हे अशोक सराफ पण तू यांना मामा म्हणायचे. त्या मुलीसोबत सेटवरील सर्वजण त्यांना मामा म्हणू लागले पुढे हेच नाव रुढ झाले आणि अशोक सराफचे अशोक मामा बनले. अशोक सराफ यांना नुकतेच पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी नुकताच त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान केला. अशोक मामांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्यावर संपूर्ण महाराष्ट्रात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. जगभरातील मराठी माणसांनी त्यांना पद्मश्री मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. अशोक मामांना अभिनयासाठी मिळालेला हा पहिला पुरस्कार नाही. याआधीही त्यांच्या अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत मात्र ते नेहमी म्हणतात की प्रेक्षकांच्या मनात मी स्थान निर्माण करू शकलो हाच माझ्यासाठी सर्वोत्तम पुरस्कार आहे आणि ते सत्यही आहे. अशोक सराफ यांच्यावर मराठी प्रेक्षकांनी जितके प्रेम केले तितके कोणत्याच अभिनेत्यावर केले नसेल. जवळपास पाच दशके आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात आढळ स्थान निर्माण करून प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या या विनोदाच्या अभिनय सम्राटाला ७८ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या प्रदेश सचिवपदी अर्शद बागवान




**मुंबई । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशाने व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिवपदी अर्शद रज्जाक बागवान यांची नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रवादी युवक संघटना वाढीसाठी व सर्व ध्येय धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण कायम सजग आणि तत्पर असाल याची पक्षाला खात्री असल्याचे नियुक्ती पत्रात म्हटले आहे.

यावेळी, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, माजी आमदार अरविंद चव्हाण, अल्पसंख्यांक प्रदेश सरचिटणीस कय्युम खान यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसची विचारसरणी, ध्येय- धोरणे ग्रामीण भागातल्या शेवटच्या माणसापर्यंत पोहचविण्याबरोबरच, युवकांचे विधायक विचारांचे संघटन उभारुन पक्ष मजबुत करण्यासाठी प्रयत्नशिल राहणार असल्याचे त्यांनी नियुक्ती दरमयान नवनिर्वाचीत प्रदेश सचिव अर्शद रज्जाक बागवान ययांनी बोलतांना व्यक्त केले. गेल्या काही वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विस्तारासाठी दिलेले योगदान, तसेच युवकांचे संघटन पाहता ही जबाबदारी देवून त्यांचा पक्षाने सन्मान केला आहे. राज्यात युवकांचे संघटन अधिक मजबुत करण्यासाठी आपण येत्या काळात अथक परिश्रम घेवून ही जबाबदारी यशस्वी रित्या पार पाडण्याचा विश्वास त्यांनी यावेळी दिला. अंगी युवा नेतृत्व गुण असलेल्या अर्शद रज्जाक बागवान यांनी युवकाचे मोठे संघटन उभे केले आहे. अर्शद बागवान यांना कुठलिही राजकीय पार्श्वभुमी नसतांना त्यांनी स्वकर्तृत्वावर पक्षात आपली वेगळी आणि स्वच्छ प्रतिमा तयार करून आणी त्यांचे असलेले पक्षासाठी योगदान पाहुन त्यांच्यावर पक्षाने राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या म हाराष्ट्र सचिव पदाची जबाबदारी सोपविली आहे. यावेळी जालना तालुका अध्यक्ष संतोष ढेंगळे, सेवादलाचे जिल्हा उपाध्यक्ष सिद्धेश्वर शिंदे, गणेश भुतेकर, संभाजी भुतेकर, लखन तुरे, आकाश शिंदे यांनी नवनिर्वाचीत राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सचिव अर्शद बागवान यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# ‘बीट प्लास्टिक पोल्यूशन’ या विषयावर संत निरंकारी मिशनचे व्यापक वृक्षारोपण व स्वच्छता अभियान

**जालना । प्रतिनिधी -** प्रकृती मानव जीवनाची सदैव सोबती राहिली आहे, तिच्या सावलीत सभ्यता उदयाला आल्या, संस्कृती विकास पावल्या आणि जीवनाचा सतत विकास होत राहिला. तथापि, मानवाच्या स्वार्थाने जेव्हा संतुलनाची सीमा ओलांडली तेव्हा या जीवनदायीनी प्रकृतीला क्षतिग्रस्त व्हावे लागले. मनुष्य कदाचित हे विसरतो, की तोही या प्रकृतीचेच एक अभिन्न अंग आहे. आज, पर्यावरणाच्या संकटाचा प्रतिध्वनी वैश्विक चेतनेला हलवून सोडत आहे. त्याचाच परिपाक म्हणून संयुक्त राष्ट्र संघाकडून दरवर्षी ५ जून रोजी ‘विश्व पर्यावरण दिवस’ आयोजित केला जातो.

या वैश्विक पुढाकारातून प्रेरणा घेत सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या लोकमंगलकारी व दूरदर्शी नेतृत्वाखाली संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन संयुक्त राष्ट्रांकडून निर्धारित थीम ‘बीट प्लास्टिक पोल्यूशन’ ला केंद्रीभूत मानून देशभरातील १८ प्रमुख पर्वतीय पर्यटन स्थळांवर ५ जून रोजी सकाळी ८.०० ते दुपारी २.०० या वेळात एक व्यापक वृक्षारोपण व स्वच्छता अभियान आयोजित करत आहे.



हा प्रयत्न केवळ स्वच्छ, हरित व संतुलित पर्यावरणाच्या दिशेने एक सशक्त पाऊल आहे इतकेच नव्हे तर आजच्या युवापिढीला प्रकृतीच्या बाबतीत संवेदनशील बनवून प्रकृतीरक्षणाची भावना व्यवहारात उतरविण्याचा एक प्रेरणादायक पुढाकारदेखील आहे. हे एक असे अभियान आहे जे सेवा, सद्भाव आणि सजगतेला जनचेतनेशी जोडण्याचे कार्य करते.

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे सचिव श्री.जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले, की निरंकारी मिशन सन २०१४ पासूनच संयुक्त राष्ट्रांच्या ‘युनाईटेड नेशन एन्व्हायरनमेंट प्रोग्राम‘ या पर्यावरण कार्यक्रमाच्या थीम वर ‘विश्व पर्यावरण दिवस’ आयोजित करत आहे. हे केवळ एका दिवसाचे आयोजन नसून एक सतत जनचेतना अभियान आहे जे प्रकृती आणि मानवता यांच्यातील सौहार्दपूर्ण संबंधांना पुन्हा सशक्त करते.

या महाअभियाना अंतर्गत देशातील प्राकृतिक सौंदर्याने नटलेल्या विविध १८ प्रमुख पर्वतीय व पर्यटन स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील महाबळेश्वर, पांचगणी, खंडाळा, लोनावळा, पन्हाळा व सोम ेश्वर; उत्तराखंडमधील मसूरी, ऋषिकेश, लेन्सडाउन, नैनीताल, चकराता व भवाली; हिमाचल प्रदेशातील सिमला, मनाली आणि धर्मशाला; गुजरातमधील सापुतारा; सिक्किममधील गीजिंग आणि कर्नाटकातील सुरम्य नंदी हिल्स उल्लेखनीय आहेत. ही स्थळे केवळ प्रकतीच्या कुशीत वसलेली आहेत असे नसून पर्यावरण जागृतीच्या बाबतीत असे केंद्रबिंदू बनत आहेत जिथे निष्काम सेवा आणि सहभाग एकत्रितपणे साकार होत आहे.

या प्रसंगी मिशनचे स्वयंसेवक, सेवादल सदस्य, भक्तगण व स्थानिक नागरिक एकोप्याने प्रार्थनेत सहभागी होऊन कार्यक्रमाची सुरवात करतील. त्यानंतर युवा स्वयंसेवक पथनाट्ये, सांस्कृतिक प्रस्तुती आणि रचनात्मक संदेशाच्या माध्यमातून प्लास्टिक प्रदूषणाचा दुष्प्रभाव आणि त्यावरील उपाययोजना यावर जनजागृती करतील. शिवाय, पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारे फलक व बॅनर हातात घेऊन मानवी साखळी तयार करुन यावेळी समाजाला प्रेरणा दिली जाणार आहे.

या विश्व पर्यावरण दिवस प्रसंगी संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशचा हा एक समर्पित प्रयास एक सार्थक संदेश देत आहे. या तर, सर्व मिळून पर्यावरणाचे रक्षण करुया ज्यायोगे भावी पिढ्यांसाठी एक स्वच्छ, सुंदर आणि संतुलीत पृथ्वी सजवली जाऊ शकेल.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# मराठवाडा विभागीय सिलंबम स्पर्धा अरुनिमा गुरुकुलात उत्साहात संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाडा विभागीय सिलंबम स्पर्धा अरुणिमा गुरुकुल येथे उत्सवात संपन्न झाल्या. यामध्ये मराठवाड्यातील संघ व खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. त्यात प्रमुख्याने छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, जालना आदी जिल्ह्यातील सिलंबम संघाने या स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळविले. ग्रामीण क्षेत्रातील मुले, मुली या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन पदक मिळवत उपस्थितांची मने जिंकली.

सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन जालना सलग्न सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र सिलंबम स्पोर्ट असोसिएशन इंडिया सिलंबम सपोर्ट असोसिएशन इंटरनॅशनल सिलंबम फेडरेशन यांच्या वतीने या २०२५-२६ यावर्षीच्या विभागीय स्तरावरील सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन स्पर्धेचे खुले मराठवाडा स्पर्धेचे आयोजन जालना येथे अरुणिमा गुरुकुल रुख्मिणीनगर रोहनवाडी येथे करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे उदघाटक श्रीकांत पांगारकर प्रमुख पाहुणे तुलजेश चौधरी, धर्मेंद्र जांगडे, भारत एखंडे, अक्षय तनपुरे यांची कार्यक्रमाचे अध्यक्ष सिलंबम स्पोर्ट्स फेडरेशन इंटरनॅशनल टेक्निकल डायरेक्टर संजय बनसोडे यांची उपस्थिती होती. तर मुख्य पंच म्हणून महाराष्ट्र सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन चे सचिव किरण अड़ागले यांनी कामगिरी बजावली.

जालना सिलंबम असोसिएशनचे क्रांतीभूषण यादव व प्रा डॉ नितीन भक्त यांनी यांनी आयोजन केले होते. आभार अरुनिमा गुरुकुलचे डॉ अक्षय बाळासाहेब तनपुरे यांनी मानले.

मराठवाडा विभागीय सिलंबम स्पर्धा जालना जिल्हा मध्ये आयोजित करण्यात आली. यामध्ये मराठवाड्यातील बहुसंख्य जिल्ह्यातील खेळाडूंनी या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन पदक मिळवली. त्यामुळे मराठवाड्यामध्ये सिलंबम या खेळाबद्दल जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार असल्याची प्रतिक्रिया सिलंबम स्पोर्ट्स फेडरेशनचे संजय बनसोडे यांनी दिली.

सिलंबम स्पोर्ट्स हा प्रथम जालना जिल्ह्यात आम्ही सुरुवात केली या खेळाबद्दल स्वतः अभ्यास करून सध्या इंटरनेट, मोबाइल मध्ये भरकटलेले बालपण, युवा वर्ग मर्दानी खेळा मध्ये कस येईल त्यांना आपल्या पारंपरिक युद्ध कौशल्य, युद्धनीति, प्रसंगावधान ह्या गोष्टी विशेषतः शिकने गरजेचे असून जालना शहरात सिलंबम (लाठी-काठी) खेळात आमच्या द्वारे २५० मुलांना प्रशिक्षण देऊन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी प्रशिक्षित करने आमचा उद्देश असल्याचे जालना जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशनचे भूषण यादव यांनी म्हटले आहे.




## पान १ वरुन

### राज्य परिवहन ...

निधीची उपलब्धता पाहून निर्णय घेण्यात येईल, असे यावेळी त्यांनी सांगितले.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांना पाच लाखापर्यंत कॅशलेस वैद्यकीय लाभ उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्याचबरोबर धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना देखील सुरू करण्यात आली आहे. या दोन्ही पैकी एक योजना निवडण्याचा पर्याय कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना स्टेट बँकेमार्फत अपघाती विमा कवच लागू करण्याबाबत बँकेशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन खाते स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेमध्ये आहेत अशा कर्मचाऱ्यांना कामगिरीवर असताना- नसताना (दोन्ही प्रकरणी) अपघात झाल्यास विमा कवच लागू करण्यात येत आले आहे. त्यामध्ये वैयक्तिक अपघातात निधन झाल्यास एक कोटी, पुर्णतः अपंगत्व आल्यास एक कोटी, अंशतः अपंगत्व आल्यास ८० लाख रुपयांपर्यंत विमा रक्कम दिली जाईल.

एसटीच्या सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना व त्यांच्या पत्नीला वर्षभर एसटीतून मोफत प्रवास करण्याचा पास देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी केली. याचा लाभ सुमारे ३५ हजार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना होणार आहे.

### मोफत कॅन्सर ...

मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात विनयकुमार कोठारी यांनी जैन संघटनेचे शहराध्यक्ष राजेश लुनिया यांच्या प्रयत्नातून सदर शिबिर आयोजित करून गोरगरिबांची सेवा करण्याची संधी मिळाल्याचे सांगितले. डॉ. सुहास विघ्ने म्हणाले की, समर्पित भावनेतून चालविल्या जाणाऱ्या वीरा कार्किनोस कॅन्सर सेंटरच्या माध्यमातून आठवड्यातील चार दिवस ग्रामीण भागात कॅन्सर जनजागृतीबाबत अभियान राबवून कॅन्सरचे लक्षणे काय आहेत, याबाबत माहिती दिली जात आहे. डॉ. प्रणोती हिरळकर म्हणाल्या की कॅन्सर लवकर बरा होत नाही, कधीच बरा होत नाही, हा गैरसमज आहे. तात्काळ निदान झाल्यास उपचाराने तो निश्चितच बरा होतो. राजेश लुनिया म्हणाले की, यापुढेही भारतीय जैन संघटनेच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागात आरोग्य सेवेचा हा महायज्ञ सुरूच राहील.

प्रारंभी धन्वंतरी पूजन व पुण्यतिथीनिमित्त स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयप्रकाश श्रीमाली यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार मंजू श्रीमाली यांनी मानले.

## मोतीबाग तलावाला संरक्षण जाळी बसविण्यासह मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील मोतीबाबग तलावाला संरक्षण जाळी बसविणे, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे व रस्त्याच्या मधोमध असलेले वीजेचे खांब त्वरीत काढावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) च्यावतीने करण्यात आली आहे.



यासंदर्भात जालना शहर महानगर पालिकेच्या आयुक्तांना दिलेल्या निवेदना म्हटले आहे की, जालना शहर महानगर पालिका हद्दीतील मोती तलाव येथे मागील तीन वर्षापासून सतत उमेदीतील तरुण पोहण्यासाठी जात असतात परंतू अचानकपणे पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने बऱ्याच तरुणांचा बुडून मृत्यू झालेला आहे. त्यातच चार दिवसापुर्वी दोन भावांचा अशाचप्रकारे मृत्यू झाला. त्याअनुषंगाने व भविष्यात अशी घटना घडू नये म्हणून संपुर्ण मोती तलावास संरक्षण जाळी बसविण्यात यावी, त्याठिकाणी दोन जलतरणपटूंची संरक्षक म्हणून नियुक्ती करावी.

तसेच काही दिवसांपुर्वी जालना शहरातील गांधीनगर भागातील एका लहान मुलीला ५-६ कुत्र्यांनी मिळून चावा घेतल्यामुळे जखमी झाल्याची घटना घडली आहे. यामुळे अशा अनेक ठिकाणी घटना घडत आहे. कबाडी मोहल्ला, रहेमानगंज भागात देखील अशा घटना घडल्या आहेत. यामुळे जालना शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त तात्काळ करण्यात यावा.

तसेच जालना शहरातील रस्त्यांचा विकास होतांना दिसत आहे. परंतू याच रस्त्यांवर अनेकांना आपला जिव गमवावा लागला. जालना शहरातील अंबड रोड वरील स्वामी विवेकानंद हायस्कुल समोर गेल्या वर्षी एक पोलीस कर्मचाऱ्याचा रस्त्याच्या मधोमध असलेल्या विजेच्या खांबाला धडकून जागीच मृत्यू झाला. तसेच दलित मित्र बाबुरावमामा सतकर यांचा याच ठिकाणी अपघात झाला व ते अत्यंत गंभीर अवस्थेत असून त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार घेत आहे.

या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून मोती तलावाला संरक्षण जाळीचे कुंपण व दोन जलतरणपटू संरक्षक नियुक्त करावी, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा आणि रस्त्यावरील विजेचे खांब काढावे, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्यावतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा ईशारा निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे.

यावेळी नंदकिशोर कन्हैय्यालाल जांगडे, कैलास मगरे, अमेर पाशा, फारुख शेख, ज्ञानेश्वर धानुरे, राजेंद्र जाधव, अकबर खा बने खान, फहाद चाऊस, अन्वर तांबोळी, राम देवकर, आमेर सिद्धीकी, आवेज खान शहरातील नागरिक यावेळी उपस्थिती होती.

## 'त्या' भ्रष्टाचारी स्वच्छता निरीक्षकांना पुन्हा जालना मनपात घेऊ नका - प्रेम जाधव

**जालना । प्रतिनिधी -** जालना नगर परिषदेची शहर महानगर पालिका झाली आहे. जालना शहरात कुठेही स्वच्छता विषयी कामे झाली नसून यास भ्रष्टाचारी स्वच्छता प्रमुख व स्वच्छता निरीक्षक जबाबदार असून जालना मनपातून बदली होऊन गेलेले पंडीत पवार, अशोक लोंढे, विलास गावंडे यांना पुन्हा जालना शहर महानगर पालिकेत घेऊ नये अशी मागणी विद्रोही पँथर गरीबांची संघटनेचे संस्थापक अध्यक्ष एस. प्रेमभाई जाधव यांनी नगर विकास विभागाचे प्रधान सचिवांकडे जालना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केली आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना नगर परिषदेवरून महानगरपालिका झाली असून यामध्ये जालना शहराचा कुठलाच स्वच्छता विषयी विकास झाला नसून याला कारणीभूत भ्रष्टाचारी स्वच्छता प्रमुख व स्वच्छता निरीक्षक पंडित सखाराम पवार व अशोक किशनराव लोंढे स्वच्छता, विलास उत्तमराव गावंडे निरीक्षक श्रेणी - क हे तीन जण गेल्या १५ ते २० वर्षापासून जालना नगरपालिकेमध्ये स्वच्छता निरीक्षकाचे काम बघत आहे. यांनी यांच्या कामामध्ये लाखो-करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला असून स्वच्छतेकडे लक्ष न देता हे स्वच्छता निरीक्षक शहरातील अनाधिकृत बांधकामाकडे लक्ष देवून त्या बांधकाम धारकांकडून त्यांनी लाखो रुपये उकळले असल्याचा गंभीर आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. जालना येथील स्वच्छते विषयी यांनी कुठलिच स्वच्छता केली नसून संपूर्ण जालना शहर हे घाणीचे साम्राज्य झाले आहे. अशा भ्रष्टाचारी स्वच्छता निरीक्षकांना पुन्हा जालना महानगर पालिकेमध्ये घेण्यात येवू नये. त्यांना जालना महापालिकेत पुन्हा रूजू केल्यास विद्रोही पँथर गरीबांची संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनासह उपोषण करण्यात करण्याचा ईशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे. निवेदनावर विद्रोही पँथर गरीबांच्या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष एस. प्रेमभाई जाधव यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# पालकांनी मान्यताप्राप्त शाळेतच आपल्या पाल्याचा प्रवेश घेण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील शालेय विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याआगोदर संबधित शाळेला शासनाची मान्यता आहे किंवा नाही याची खात्री जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व) तसेच जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागात करावी. मान्यता प्राप्त शाळा असेल तरच पालक, विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित करून भविष्यात अडचण निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.

शासनाची मान्यता नसलेल्या शाळेत प्रवेश घेऊन विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान झाल्यास शिक्षण विभाग जबाबदार राहणार नाही. तरी पालकांनी आपल्या पाल्याचे अधिकृत व मान्यताप्राप्त असलेल्या शाळेतच प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

